ठाणेवैभव




# आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कल्याण :** रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि आर्यन इन्स्टिट्यूट ऑफ चेस एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा नवरंग बँक्वेट हॉल, कल्याण येथे घेण्यात आली.

या स्पर्धेचे उदघाटन अर्जुन अवॉर्ड विजेते ग्रँड मास्तर प्रवीण ठिपसे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी भारतातील सर्व राज्यातून खेळाडू आले होते.स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 350 पेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. ही स्पर्धा डिजिटल बोर्डद्वारे 180 देशात दाखवण्यात आली.

या स्पर्धेसाठी विविध 18 राज्यांतून इंटरनॅशनल मास्टर्स व ग्रँड मास्टर सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये एका दिवसात 9 राउंड्स स्विस लीग पद्धतीने घेण्यात आली. प्रत्येक खेळाडूला 10-10 मिनिटांचा वेळ होता, 5 सेकंदांचे इन्क्रिमेंट देण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस समारंभासाठी रोटरी डिस्ट्रिक्ट 3142 चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर दिनेश मेहता व डीजीएनडी चंद्रहास शेट्टी, एजी महेंद्र हिंगोरानी उपस्थित होते. खेळाडूंना अडीच लाखा पेक्षा जास्त बक्षिसे देण्यात आली व 93 ट्रॉफी देण्यात आल्या. या स्पर्धेसाठी रोटरी क्लब ऑफ कल्याणचे सल्लागार व माजी प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. दीपक वझे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

क्लबचे अध्यक्ष पराग कापसे, सचिव आत्माराम घाणेकर, शोभा घारपुरे, माजी अध्यक्ष अरुण सपकाळे, दिलीप कर्डेकर, दीपक पटेल, माधवी कुलकर्णी, चंद्रशेखर कुलकर्णी, हनीफ सय्यद, रेश्मा सय्यद, रुईता सपकाळे, पुर्वा कापसे, रोहन गोळे, जय राठोड उपस्थित होते. कल्याणमधील अनेक मान्यवर व डॉक्टर्स या स्पर्धेसाठी आवर्जून उपस्थित होते. या स्पर्धेसाठी एफआयडीई, एआयसीएफ, एमसीए, टिडीसीए, केटीबीएस या संस्थांची मान्यता व सहकार्य लाभले.